International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.4 Mar – Apr 2023

# दशरूपक आणि नाट्यदर्पण या ग्रंथांमधील नायिकांविषयक विचार - तुलनात्मक अध्ययन

**श्रीमती शर्वरी विक्रांत वैद्य**
संशोधक छात्रा , रा . तु . म . नागपूर विदयापीठ , नागपूर
*Corresponding Author* - **श्रीमती शर्वरी विक्रांत वैद्य**
Email : sharvarivaidya0@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7919447

**सारांश -**

दशरूपक आणि नाट्यदर्पण या ग्रंथांमधील नायिकांविषयक मतांचा तुलनात्मक अभ्यास या शोधनिबंधात केला आहे. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात नायिकांचे प्रमुख तीन भेद सांगितले आहेत. १. स्वकीय नायिका २. परकीया नायिका आणि ३. साधारण स्त्री (गणिका) त्याच बरोबर त्यांच्या अवस्थांचा उल्लेखही यात केलेला आहे. दशरूपककार आणि नाट्यदर्पणकार याच मताशी सहमत आहेत. भारतीय नाट्यशास्त्रात दशरूपक आणि नाट्यदर्पण हे अतिशय प्रसिद्ध ग्रंथ आहेत . या दोन्ही ग्रंथांमध्ये भरतमुनी मान्य नायिकांचे मुख्य तीन भेद, त्यांचे पोटभेद आणि त्यांच्या अवस्था यांचे विस्तृतपणे विवेचन केले आहे. विस्तारभयास्तव नायिकांचे तीन भेद, त्यांचे पोटभेद आणि नायिकांच्या अवस्थांचे विवेचन थोडक्यात या शोधनिबंधात केले आहे.

**बीजशब्द -** दशरूपक, नाट्यदर्पण, नायिका, नायिकांचे पोटभेद, त्यांच्या अवस्था, नाट्यशास्त्र.

**प्रस्तावना -** "भरतमुनीकृत अष्टनायिका"

अष्टनायिकांची सर्वप्रथम चर्चा इसवीसनाच्या पाचव्या शतकात आचार्य भरतमुनींनी केली. या नायकेचे आपल्या प्रिय व्यक्तीशी मिलन अथवा वयोग यांतुन निर्माण होणाऱ्या आठ अवस्था म्हणजे अष्टनायिका. भरतमुनींच्यानुसार नायिका एकंदरीत चार प्रकारच्या असू शकतात. दिव्या, नृपपत्नी, कुलजा व गणिका. भरतमुनींनी नायिकांमध्ये असणारे विशेष गुण ही सांगितले आहेत.

ह्या विशेष गुणांवरूनच पुढे प्रत्येकीचे भेद व त्या भेदांचेही पुन्हा ज्येष्ठा व कनिष्ठा असे उपभेद केले आहेत. दशरूपककार आणि नाट्यदर्पणकार हे देखील याच मताशी सहमत आहेत. भारतीय नाट्यशास्त्रात दशरूपक आणि नाट्यदर्पण हे अतिशय प्रसिद्ध ग्रंथ आहेत. या दोन्ही ग्रंथात भरतमुनी मान्य नयिकांचे चार भेद त्यांच्या गुणांवरून त्यांचे उपयोग भेद याचे विवेचन केले आहेत. विस्तारभयास्तव केवळ थोडक्यात या सगळ्यांचे विवेचन या प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे.

**हेतू / उद्देश -**

दशरूपक आणि नाट्यदर्पण या ग्रंथांमधील नायिका, त्यांच्या अवस्था, त्यांचे गुणांनुसार भेद यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतक -** दशरूपक आणि नाट्यदर्पण या दोन ग्रंथांमधील नायिका, त्यांच्या अवस्था यांच्यातील मतप्रवाह बरेच समान आढळतात. काही ठिकाणी आपल्याला मतभेदही आढळतात.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तुलनात्मक शोध पद्धतीचा अवलंब केला आहे.

**दशरूपकातील नायिकांविषयक विचार -**

संस्कृत नाट्यशास्त्राच्या शास्त्रीय विवेचनाच्या क्षेत्रात धनंजय विरचित दशरूपक याचे महत्त्व विद्वतसमाजात सुविदित आहे. धनंजयांविषयी जी माहिती प्राप्त आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की धनंजय हे विष्णूचे पुत्र आणि मालव प्रांताच्या परमारवंशीयशासक महाराज मुंच यांचे सभा पंडित होते. दशरूपकाचा रचनाकाळ नवव्या शतकाच्या मध्यातील असावा असा अंदाज आहे. दशरूपक नाट्य शास्त्राचा एक प्रमुख आधार ग्रंथ आहे. दशरूपकाची रचना पद्यमय आहे. त्यात अनुष्टुभ छंदाचा प्रयोग केलेला आहे. काही दोष असूनही आपल्या अपूर्व गुणांमुळे हा दशरूपक ग्रंथ नाट्यविद्येच्या जिज्ञासूंना उपदेशकारक बनला आहे. दशरूपकातील द्वितीय प्रकाशात धनंजयाने नायिका आणि त्यांच्या प्रकारांचे विवेचन करताना खालील कारिका उद्धृत केली आहे.

(२४) स्वान्या साधारणस्त्रीति तद्गुणा नायिका त्रिधा ।

(धनंजयविरचित दशरूपकम् = डॉ. श्रीनिवासशास्त्रीणा ; पृ.क्र. १३४)

अर्थात - नायकासमानच गुणांनी युक्त नायिका असतात ज्या तीन प्रकारच्या असतात -

स्वकीया, परकिया तथा साधारणस्त्री।

नायिका पण सामान्यतः नायकाच्या गुणांनी युक्त असते.

**१. स्वकीया -**

प्रस्तुत तीन प्रकारच्या नायिकांमध्ये स्वकीयेचे लक्षण सांगताना दशरूपककार म्हणतात स्वकीय नायिका शील तथा सरलता इत्यादी गुणांनी युक्त असते, ती मुग्धा, मध्या तसेच प्रगल्भा या तीन प्रकारची असते. स्वकीया नायिकेच्या लक्षणांमध्ये संस्कृत साहित्यशास्त्रामध्ये आदर्शवादितेची झलक दिसते.

**(क) मुग्धा नायिका**

ज्या नयिकांची अवस्था तसेच काम-भावना नवीन असते, जी रतिक्रीडेमध्ये लाजणारी (वामा = विपरीत, प्रतिकूल, विमुख) आणि क्रोधित होत नाही, ही मुगधा नायिका होय. मुग्धा नायिकांचे पण काही प्रकार दशरूपककाराने सांगितले आहेत ते म्हणजे काममुग्धा, रतवामा इत्यादी.

**(ख) मध्या नायिका**

ज्यात यौवन आणि काम यांचा उदय होत आहे, जी बेसुधी अवस्था म्हणजेच मोहामधून रति पर्यंत जाण्यास समर्थ आहे, ती मध्या नायिका आहे. या प्रकारामध्येच धीरा, अधीरा तसेच धीराधीरा हे देखील नायिकांचे उपभेद सांगितले आहेत.

**(ग) प्रगल्भा नायिका**

जी यौवनाने अंध झालेली, कामाने उन्मत्त झालेली, आनंदाच्या कारणाने प्रियकरात प्रवेश करणारी, आरंभापासूनच चेतना रहित असलेली ती प्रगल्भा नायिका असते. दशरूपककाराने प्रगल्भा नायिकांचे काही भेद सांगितले आहेत. जसे भावप्रगल्भा, रतप्रगल्भा इत्यादी. दशरूपककार प्रगल्भा नायिकेलाच "प्रौढा" असेही संबोधतात. मध्या तसेच प्रगल्भा नायिका दोन प्रकारच्या असतात. ज्येष्ठा तसेच कनिष्ठा अशाप्रकारे मुग्धा पेक्षा वेगळे नायिकांचे बारा भेद आहेत. परंतु मुग्धा तर एकच प्रकारची असते. अशा प्रकारे स्वकीया नायिकेचे तेरा भेद आहेत.

**परकीया (अन्य स्त्री)** अन्यस्त्री (परकिया) दोन प्रकारची असते. कन्या तसेच विवाहिता. अन्य विवाहिता स्त्री (परोढाला) कधीही प्रधान रसाची नायिका बनवू नये.

**साधारण स्त्री (सामान्य नायिका)**

साधारण स्त्री तर गणिका असते, जी कलेने, प्रगल्भतेने आणि धूर्ततेने युक्त असते.

**नायिकांच्या अवस्था**

दशरूपककारानुसार नायिकांच्या आठ अवस्था असतात.

१) स्वाधीनपतिका

२) वसकसज्जा

३) विरहोत्कंठिता

४) खंडिता

५) कलहांतरिता

६) विप्रलब्धा

७) प्रेषितप्रिया

८) अभिसारिका

अशाप्रकारे दशरूपककाराने नायिकांचे भेद ,उपभेद विशद करून सांगितले आहेत.

**नाट्यदर्पणातील नायकाविषयक विचार**

प्रस्तुत ग्रंथ 'नाट्यादरणाचे' रचनाकार रामचंद्र गुणचंद्र पश्चिम भारतात स्थित गुजरात प्रांताचे निवासी होते. रामचंद्र गुणचंद्र हे आचार्य हेमचंद्र यांचे शिष्य होते. यांचा काळ इसवी सन तेरावे शतक आहे. रामचंद्र आणि गुणचंद्र यांचा कार्यकाळ हा गुजरातचे सिद्धराज ,कुमारपाल आणि अजयपाल या तिन्ही राज्यांच्या शासन काळातील आहे. नाट्यदर्पण हे कारिका शैलीत रचल्या गेलेले आहे त्याची वृत्ती ही या दोन आचार्यांनी लिहिली आहे . हे पुस्तक चार विवेका मध्ये विभागलेले आहे. ग्रंथात एकूण २०७ कारिका आहेत. प्रस्तुत नाट्यदर्पण ग्रंथाचा मूळ आधार भरतमुनी कृत नाट्यशास्त्र आहे. नाट्यदर्पणातील चतुर्थ विवेकात रामचंद्र गुंणचंद्र यांनी नायिका आणि त्यांच्या प्रकारांचे विवेचन करताना खालील कारिका उद्धृत केली आहे - (सू . २५५)

नायिका कुलजा दिव्या क्षत्रिया पण्यकामिनी ।<br>अंतिमा लालीतोदात्ता पूर्वोदात्ता त्रिधा परे ।।(१९)१७२।।

(श्री . रामचंद्र गुण चंद्र विरचित नाट्यदर्पण - प्रधान संपादक - डॉ . नगेंद्र )

प्रस्तुत कारिकेत नाट्यदर्पणकार नायिकांचे लक्षण सांगताना म्हणतात -

कुलजा दिव्या क्षत्रिया आणि वेश्या (चार प्रकारच्या )नायिका असतात . त्यातील अंतिम म्हणजेच वेश्या नायिका ललितोदात्त असते. आणि पहिली अर्थात कुलजा नायिका उदात्त असते . उरलेल्या दोन दिव्या आणि क्षत्रिया अर्थात धीरा, ललिता आणि उदात्ता तीन प्रकारच्या असतात .

अर्थात ब्राम्हण या क्षत्रिय इत्यादी कुळात उत्पन्न झालेली. या नायिकांचे तीन भेद आहेत. अर्थात कुलचा दिव्या क्षत्रिया आणि गणिका या चार नायिका; मुग्धा मध्या आणि प्रगल्भा याप्रमाणे तीन प्रकारच्या असतात. हे अर्थात कुलजा आदि चार नायिका यातील प्रत्येकीचे तीन- तीन भेद होतात. एकूण 12 भेद आहेत.

अर्थात यौवन आणि काम यांच्या उठावावर स्थित स्वल्प मान असलेली तथा सुरतव्यापारात प्रतिकूल असलेली नायिका मुग्धा नायिका म्हणवल्या जाते. मध्यम आयु, मध्यम काम आणि मध्यम मान असलेली तसेच दिसण्यात मूर्च्छेपर्यंत पोहोचणारी मध्या नायिका असते. पूर्णरूपाने दीप्त आयु, काम तसेच मान वाली आणि प्रियकराच्या स्पर्शाने आनंदातिरेकाने मूर्च्छित होणारी नायिका प्रगल्भा नायिका म्हणवली जाते.

नाट्यदर्पणकाराने नायिकांच्या ८ भावावस्था सांगितल्या आहेत .

१)प्रेषितपतिका,

२)विप्रलब्धा ,

३)खंडिता ,

४)कलहांतरिता ,

५)विरहोत्कंठिता ,

६)वासकसज्जा ,

७)स्वाधीनभतृका ,

८)अभिसारिका .

अशाप्रकारे नाट्यदर्पणकाराने नायिकांचे भेद, उपभेद विशद करून सांगितले आहेत.

**धनंजय विरचित दशरूपक आणि रामचंद्र गुणचंन्द्र विरचित नाट्यदर्पण या दोन्हीही ग्रंथांमधील नायिकां विषयक विचारांचे अध्ययन केल्यानंतर खालील बाबतीत साम्य आढळले .**

१)दोन्ही ग्रंथकारांनी नायिकांचे तीन प्रकार सांगितले आहेत.

२)दोन्हीही ग्रंथांमध्ये नायिकांच्या ८भावावस्था सांगितल्या आहेत.

**धनंजय विरचित दशरूपक आणि रामचंद्र गुणचंद्र विरचित नाट्यदर्पण या दोन्हीही ग्रंथांमधील भेद खालील बाबतीत आढळतो.**

१)नाट्यदर्पणकाराचे विषय प्रतिपादन करणे हे दशरूपककाराच्या अपेक्षेने अधिक विशद आणि विस्तृत आहे.

२)नाट्यदर्पणकाराच्या उदाहरणांचे क्षेत्र दशरूपककाराच्या अपेक्षेपेक्षा अधिक व्यापक आहे.

३)नाट्यदर्पणात दिलेले उदाहरण नाट्यदर्पणकाराने ६३ नाटकांमधून घेतलेले आहेत. ज्यातील ११नाटक स्वयम् रामचंद्र यांची आहेत.

**निष्कर्ष -**

धनञ्जय विरचित दशरुपक आणि रामचन्द्र गुणचन्द्र विरचित नाट्यदर्पण या दोन्ही ग्रंथांमधील नायिकांविषयक विचारांचे तुलनात्मक अध्ययन केल्यानंतर असे प्रकर्षाने जाणवते की या दोन्ही ग्रंथांमधील विचारांमध्ये साम्य अधिक आढळते तर भेद कमी आढळतो. जे भेद आहेत ते अगदीच नगण्य आहेत . या दोन ग्रंथकारांच्या मतांमध्ये कुठेही विरोध दिसत नाही . दोन्ही ग्रंथकारांची मत परस्परपूरक आहेत म्हणूनच या दोन्ही ग्रंथांना संस्कृत नाट्यशास्त्रात महत्त्वाचे स्थान आहे .दशरूपककार आणि नाट्यदर्पणकार या दोघांनीही भरतमुनींच्या नाट्यशास्त्राला प्रमाण मानून आपल्या ग्रंथांचे विवेचन केले आहे .दशरूपक आणि नाट्यदर्पण या दोन्ही ग्रंथांची तुलना करताना 21 स्थळी मतभेद आढळतात.

**संदर्भसूची-**

१)धनंजयविरचित दशरूपकम् = डॉ. श्रीनिवासशास्त्रीणा ; पृ.क्र. १३४

२)श्री . रामचंद्र गुणचंद्र विरचित नाट्यदर्पण - प्रधान संपादक - डॉ . नगेंद्र

**संदर्भग्रंथ सूची -**

१) डॉ. मालवीय सुधाकर, दशरूपक, १९९५, कृष्णदास अकादमी, वाराणसी.

२) श्री रामचंद् - गुणचंद्र, नाट्यदर्पण, हिंदी विभाग, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली.

३) केतकर गोदावरी वासुदेव, भारतीय नाट्यशास्त्र, १९२८, परिमल पब्लिकेशन्स, दिल्ली.

४) डॉ. घोंगे पराग, भरतमुनींचे नाट्यशास्त्र - एक रसास्वाद, २०१७, विजय प्रकाशन, नागपूर.

५) डॉ. वर्णेकर श्रीधर भास्कर, संस्कृत वाङ्मयकोश (प्रथम खंड, द्वितीय खंड), १९८८, भारतीय भाषा परिषद, ३६ - ए, शेक्सपीयर सरणी, कलकत्ता.

६) भरतमुनी, भारतीय नाट्यशास्त्रम्, गायकवाड संस्कृत सिरीज, बडोदा.

७) डॉ.श्रीनिवासशास्त्रि , दशरूपक, १९८६-८७ ई . साहित्य भंडार ,सुभाष बाजार , मेरठ